# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५.
दूरध्वनी: ०२२ - २२१६३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२ - २२१६३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in संकेतस्थळ: www.merc.gov.in/www.mercindia.org.in

MERC


जाहिरात क्र. ०५/२०१७-१८

## जाहीर सूचना

## महाराष्ट्रातील स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी आ.व. २०१०-११ ते २०१३-१४ मध्ये केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या पूर्ततेच्या पडताळणीवर अभिप्राय मागविण्याबाबत

नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ), त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१० मधील तरतुदीं अंतर्गत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग), २०१७ च्या प्रकरण क्र. १०१ अंतर्गत राज्यातील स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचे (सीपीपी) उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१३-१४ च्या कालावधीत केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या पूर्ततेची पडताळणी करीत आहे.

महाऊर्जाने दिलेल्या माहितीच्या आधारे, आयोगाने, ६८० सीपीपी उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहकांना, प्रतिज्ञापत्राद्वारे, त्यांनी लक्ष्यांकाची केलेली पूर्तता, अ-पूर्तता आणि अशी पूर्तता करण्यापासून मिळालेली सूट, त्यासाठीच्या आवश्यक दस्ताऐवजांच्या पुराव्यासह, जसे की, वीज खरेदीची देयके, आरईसी प्रमाणपत्रे, प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र, इ. सादर करण्यासाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीच्या प्राथमिक विश्लेषणाच्या आधारे, आयोगाने सदर उपयोगकर्ते/ग्राहकांचे त्यांनी केलेल्या आरपीओ बंधनाच्या लक्ष्यांकाच्या पूर्ततेनुसार खालीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे :-

| अनु. क्र. | मुक्त प्रवेश ग्राहक / सीपीपी उपयोगकर्ते | उपयोगकर्ते/ ग्राहकांची संख्या |
|---|---|---|
| १. | पूर्तता करणारे मुक्त प्रवेश ग्राहक | ४ |
| २. | अंशतः पूर्तता करणारे मुक्त प्रवेश ग्राहक | २६ |
| ३. | पूर्तता न करणारे मुक्त प्रवेश ग्राहक | ६० |
| ४. | माहिती सादर न केलेले मुक्त प्रवेश ग्राहक | ८४ |
| ५. | सूट देण्यात आलेले मुक्त प्रवेश ग्राहक – समाधानकारक | १०० |
| ६. | सूट देण्यात आलेले मुक्त प्रवेश ग्राहक – आरईसी मान्यताप्राप्त प्रकल्प | १०६ |
| ७. | सूट देण्यात आलेले मुक्त प्रवेश ग्राहक – स्रोत माहित नसलेले | २० |
| ८. | अंशतः पूर्तता करीत असलेले सीपीपी उपयोगकर्ते (१) पूर्तता करीत नसलेले सीपीपी उपयोगकर्ते (८) | ९ |
| ९. | माहिती सादर न केलेले सीपीपी उपयोगकर्ते | ११४ |
| १०. | सूट दिलेले सीपीपी – समाधानकारक | १५७ |
| | **एकूण** | **६८०** |

आरपीओ बंधनाची पूर्तता, अ-पूर्तता आणि सूट याबाबतच्या सद्यस्थितीची खात्री करण्यासाठी, महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीवर सीपीपी उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहकांकडून दिनांक १० जुलै, २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी प्रतिक्रिया मागविण्यात आल्या आहेत. महाऊर्जाने प्रत्येक उपयोगकर्ता/ग्राहकाच्या संबंधात दिलेली माहिती, विनियमांसह आयोगाच्या **www.merc.gov.in/www.mercindia.org.in** या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

या विनियमांतर्गत सीपीपी उपयोगकर्ते व मुक्त प्रवेश ग्राहकांनी केलेल्या आरपीओ पूर्तते संबंधात महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीवर, आयोग जनतेकडून अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती लेखी मागवित असून त्या सहा (१+५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५. (फॅक्स: २२१६ ३९७६ ई-मेल: **mercindia@merc.gov.in**) या पत्त्यावर दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील अशा रितीने पाठवाव्यात.

सदर अभिप्राय पाठविणाऱ्याने त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे त्यात नमूद करण्यात यावे. तसेच सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर तसे त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून, **दि. १ ऑगस्ट, २०१७ रोजी ११.०० वाजता, सेंट्रम हॉल, पहिला मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

स्वाक्षरी/-
**सचिव**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

ठिकाण : मुंबई
दिनांक : **२७ जून, २०१७**